# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१२२/२०१७ मधील निशाणी क्र.२३ वर आदेश

**CNRNO.MHLA120005432017.**

१. सदरचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांनी विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादींना घरगुती अडचणीमुळे मुदतीत प्रकरणामध्ये हजर होऊन कैफियत दाखल करता आलेली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द झालेला विना–कैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची सदर प्रतिवादींनी विनंती केली आहे.

२. सदर अर्जास प्रतिदाव्यातील वादींनी म्हणणे दाखल करून तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामध्ये थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील कारण योग्य व संयुक्तिक नाही. त्यामुळे अर्ज चालू शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याचे प्रतिदाव्यातील वादींनी मागणी केलेली आहे.

३. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर अर्जाच्या कथनाच्या पृष्ठर्थ सदर प्रतिवादींनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदर प्रकरणातील प्रतिवादींनी दि.२५/०९/२०१७ रोजी सदर प्रतिदावा दाखल केलेला असून त्या प्रतिदाव्याची प्रत प्रतिदाव्यातील प्रतिवादींनी त्याचवेळी स्वीकारलेली आहे. परंतु, प्रतिदाव्यातील प्रतिवादींनी मुदतीमध्ये कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे केवळ नैसर्गीक न्यायाचे तत्व विचारात घेवून माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्यासाठी पक्षकारांमधील वाद गुणदोषावर निकाली काढणे

आवश्यक आहे. त्याकरीता प्रतिवादी क्र.१ व २ यांना बचाव मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारामधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादीवर खर्च बसवून मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.२३ वरील अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ वर रक्कम रु.१०००/- खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिदाव्यातील प्रतिवादींनी वादींना पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

स्वा/-

दि. १९.१२.२०१८. (शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N.Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 19.12.2018 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 19.12.2018 |
| Judgment/Order uploaded on | : | 20.12.2018 |